दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)


छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २०७ || बुधवार १० जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




# गुराढोरांचे दवाखाने नावाला! डॉक्टर कर्मचारी जातात गावाला! औषधा वाचुन जनावरांचे हाल,अधिकारी मात्र मालामाल!

भोकरदन प्रतिनिधी
सद्दाम मिर्झा

शेतकरी संकटात आहे. शेतकऱ्याला शेती करणे परवडत नाही. शेती करण्याचा खर्च वाढला आहे. त्यामुळे सरकार व अनेक तज्ञ लोक शेतकऱ्याला पूरक जोड धंदा करण्याचे मार्गदर्शन करतात. त्यासाठी पशुसंवर्धन खाते आहे. अनेक अधिकारी व कर्मचारी नेमलेले आहेत.करोडो रुपये सरकारचा खर्च होतो परंतु प्रश्न असा आहे की याचा लाभ या गुरे ढोरे पाळणाऱ्या शेळ्या मेंढ्या



पाळणाऱ्या लोकांना होतो का ? होऊ दिला जातो का? नेमलेले सरकारी दवाखान्याचे कर्मचारी, डॉक्टर हे खरेच शेतकऱ्यांना आणि शेतमजुरांच्या गुराढोरांची सोय घेतात का ? त्यांना सरकारच्या आलेल्या औषधांचा फायदा घेऊ देतात का ? हा प्रश्न आहे त्यावर मोठमोठे शिबिर घेतल्या जातात खर्च होतो प्रचार होतो त्यासाठी कोट्यावधी रुपयाचे बजेट सरकार मंजूर करते आणि गुराढोरांचे दवाखाने पशुसंवर्धन खाते स्वतंत्रपणे काम करते अधिकारी कर्मचारी त्यासाठी नेमलेले आहेत खरी परिस्थिती अशी आहे की कोणीही गुरुद्वारे शेळ्या मेंढ्या पाळणारा शेतकरी शेतमजूर जेव्हा या दवाखान्यामध्ये त्यांची मदत घेण्यासाठी जातो त्यावेळेस त्या ठिकाणी कर्मचारी हजर नसतात.डॉक्टर हजर नसतात.रजेवर गेले, मिटींगला गेले ,असे अनेक बहाने करून हे लोक त्या ठिकाणी गैरहजर असतात या लोकांचा पगार मात्र सुरू असतो.लसीकरण यांच्यामार्फत होणे आवश्यक असताना कधीही लसीकरण केले जात नाही. परीणामी जनावरे दगावतात शेतकऱ्यांना शेतमजुरांना लसिकरणाचा फायदा दिला जात नाही.गाई म्हशी शेळ्या मंडळाचा लावून घ्यायचे असल्या तरी ह्या डॉक्टर लोकांना पैसे द्यावे लागतात. शेळी मेंढी किंवा एखाद्या जनावर जर आजारी पडले तर औषध उपचार करण्यासाठी औषधे घेण्यासाठी या डॉक्टर लोकांना पैसे द्यावे लागतात. मग हे सरकारी दवाखाने कशासाठी हे डॉक्टर जर पैसे घेतात यांच्याकडे कोणाचे लक्षण आहे का ? सरकारचा करोड रुपयांचा खर्च कशासाठी होत आहे याचे उत्तर सापडेल का यासाठी कोणी चौकशी करणार का आम्ही ज्या वेळेस अनेक दवाखान्यामध्ये भेट देतो त्यावेळेस असे लक्षात येते की डॉक्टर गैरहजर असतात. कर्मचारी गैरहजर असतात औषधे मिळत नाही शेळयासाठी ज्या मिनरल्सच्या विटा येतात त्या दिल्या जात नाही मोफत मध्ये शेतकऱ्यांच्या गुराढोरांचे शेळ्या मिळण्याचे लसीकरण केले जात नाही ज्या उद्देशाने हे दवाखाने आणि एवढा कोट्यावधी रुपये खर्च आहे त्या उद्देश साध्य होत नाही सफल होत नाही मग हे दवाखाने चालू कशासाठी ठेवले यामध्ये फक्त त्या ठिकाणी नेमलेलें डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचा फायदा आहे यामध्ये शेतकरी शेतमजूर यांचा काहीच फायदा नाही त्यामुळे सरकारने या दवाखान्यावर वचक ठेवावा आणि या सर्व कर्मचाऱ्यांना व्यवस्थित कामाला लावावे आणि त्या दवाखान्यांमध्ये सर्व साहित्य ठेवावे अन्यथा यासाठी आंदोलन करावे लागेल

## धानाच्या चुकाराचे पैसे दोन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार

दैनिक सूर्योदय
निश्चल येनोरकर भंडारा

शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून रब्बी हंगामातील झालेल्या धान खरेदी पैकी उर्वरित ५५ कोटी रुपये भंडारा जिल्हा व ७७ कोटी गोंदिया जिल्ह्याची रक्कम येत्या दोन दिवसात जिल्हा मार्केटिंग कार्यालयाला प्राप्त होऊन लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात वळती केली जाईल, असे माजी खासदार सुनील मेंढे यांनी स्पष्ट केले आहे. या संदर्भात सुनील मेंढे यांनी मार्केटिंग फेडरेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संपर्क करून माहिती घेतली. ङ्गभंडारा जिल्ह्यात रब्बी हंगामातील उत्पादित धानाची मे आणि जून या दोन महिन्यात शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून ३ लाख ११ हजार ९७६ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली होती. मे महिन्यात खरेदी करण्यात आलेल्या या धानापोटी देय असलेली १२ कोटी ९९ लाख ८४ हजार ३३३ रूपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली.



मात्र जून महिन्यातील खरेदीपोटी शेतकऱ्यांना अदा करावयाची ५५ कोटी १० लाख ६० हजार २५६ ही रक्कम प्राप्त झाली नव्हती. तसेच गोंदिया जिल्ह्यातील एकूण खरेदी ४ लाख ७२ हजार ७०१ क्विंटल ची देय रक्कम १०३ कोटी १९ लाख पैकी २६ कोटी ९ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. उर्वरित ७७ कोटी रुपये ङ्गयेत्या दोन दिवसात जिल्हा मार्केटिंग कार्यालयाला प्राप्त होऊन लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात वळती होणार आहे. या अनुषंगाने माजी खासदार सुनील मेंढे यांनी केंद्र शासनाच्या पुरवठा विभागाचे अधिकारी आणि मार्केटिंग फेडरेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनी द्वारे संवाद साधला. शेतीचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या धानाचे चुकारे विना विलंब दिले जावेत असा आग्रह त्यांनी धरला. दरम्यान त्यांच्या या मागणीला सकारात्मक घेतल्याचे समजते. केंद्र शासनाकडून ही रक्कम आता प्रधान कार्यालयाला पाठविण्यात आली असून लवकरच ती जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांकडे वळती केली जाणार असल्याची माजी खा. सुनील मेंढे यांनी दिली. जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांकडे येताच शेतकऱ्यांच्या खात्यात ती वळती केली जाणार असल्याने शेतकऱ्यांनी चुकाऱ्यांच्या संदर्भात काळजी करू नये, लवकरच एक ते दोन दिवसात ही रक्कम खात्यात जमा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा लक्षात घेत माजी खासदार सुनील मेंढे यांनी केलेला हा पाठपुरावा नक्कीच शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरेल यात शंका नाही..

## सरकारच्या जन हितोपयोगी योजना राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी च्या माध्यमातुन जनतेपर्यंत पोहचवा – राजेंद्र जैन

दैनिक सूर्योदय
निश्चल येनोरकर भंडारा

क्षेत्रात खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या नेतृत्वामध्ये अनेक विकासाची कामे झाली आहेत. सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या धानाला बोनस, लाडली बहन योजना, मुलींना उच्च शिक्षणात मोफत शिक्षण, एस टी बस मध्ये ५० टक्के सवलत असे अनेक महिलांच्या हिताची कामे झाली आहेत. महायुती सरकारच्या वतीने अमलात आणलेली अनेक जन हिताची कामे जनतेपर्यंत पोचविण्याचे काम पक्षाच्या कार्यकर्त्यांनी करावे असे कार्यकर्त्यांना संबोधतांना माजी आमदार राजेंद्र जैन बोलत होते.



ङ्गराष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची काटी जिल्हापरिषद क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक कबीर आश्रम काटी येथे माजी आमदार राजेंद्र जैन, कुंदन कटारे, गणेश बरडे, केतन तुरकर,अखिलेश सेठ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

जैन पुढे म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहून महायुतीचा उमेदवार निवडून येण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ता व पदाधिकारी यांनी कामाला लागून युवक व महिलांना सक्रियतेने विविध योजनांचा लाभ देण्याचे कार्य करावे तसेच प्रत्येक बुथ वर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ची कमेटी बनविण्याचे काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सर्वश्री राजेंद्र जैन, कुंदन कटारे, गणेश बरडे, केतन तुरकर, अखिलेश सेठ, रजनी गौतम, माणिक पडवार, राजेश जमरे, सुनील पटले, शैलेश वासनिक, सतीश कोल्हे, अनिल बावनकर, प्रकाश बरैय्या, आरजू मेश्राम, चंद्रकुमार चौहान, प्रकाश नेवारे, विश्वनाथ चौधरी, प्रेमलाल बरैय्या, नूतनलाल बिजेवार, नंदकिशोर हरिणखेडे, मकसूद कुरेशी, इंदल चौहान, छन्नूलाल तुरकर, मतीन कुरेशी, सोमाजी नेवारे, नंदकिशोर कावरे, भुवन हलमारे, लोकेश जगणे, महेश नेवारे, देवेंद्र पटले, प्रकाश तिजारे, किशोर पारधी, किशोर माने, महेश खरे, विनोद माने, घनश्याम पाचे, आकाश माने, गुनाराम मानेश्वर, छगनलाल बिसेन, विजय पंजरे, सुरेंद्र उदापूरे, रामेश्वर चौधरी, कुवर तुरकर, राकेश कुमरे, अनिरुद्ध जमरे, डालीराम बाहे, शुभम मेश्राम, सरोज बोरकर, विशाल बोरकर, हरी कटंगकर, निकुंज तिवारी, सणत पाचे, जयराम भोयर, देवेंद्र धार्मिक, जितेंद्र धार्मिक, लोकेश बावनकर, अतितकुमार तुरकर, दिनेश चौधरी, संभू असाटी, राकेश ठाकरे, अमोल टेकाम, संतोष ठाकरे, राजेश भातपिरे, संतोष पाचे, सदाशिव नागेश्वर, येशू कावरे, सेवक पंजरे, दिनेश पाचे, धर्मेंद्र परिमल, राजू तुरकर सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## पैनगंगा उपखोऱ्यातील शासनाने मंजूर केलेल्या ४९.५८ टीएमसी पाण्याची मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी सिंचन प्रकल्प निहाय तातडीने अंमलबजावणी करावी सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर यांची मागणी

पैनगंगा उपखोऱ्यात शासनाने मंजूर केलेले पाणी गोदावरी पाणी तंटा लवादाने पैनगंगा उपखोऱ्यात निम्न पैनगंगा धरणापर्यंतचे सर्व पाणी महाराष्ट्रास अनुज्ञेय केलेले आहे निम्न पैनगंगा धरणापर्यंत ७५ टक्के विश्वासार्हतेने ४७४२ दशलक्ष घनमीटर येवा उपलब्ध आहे तथापि महाराष्ट्र व आंध्र प्रदेश या दोन राज्यातील सचिव स्तरावरील दि.१०.१२.१९९८ रोजीचे बैठकीतील चर्चेनुसार निम्न पैनगंगा धरणापर्यंतचा महाराष्ट्रास अनुज्ञेय असलेला पाणी वापर ३३३८ दलघमी एवढा मर्यादित केला आहे गोदावरी खोरे जलआराखड्यात तसेच राज्य एकात्मिक जल आराखड्यात सदर मर्यादित केलेला पाणी वापर गृहीत धरल्याने पैनगंगा उपखोऱ्यात पाणी शिल्लक नसल्याचे दर्शविण्यात आलेले आहे तथापि लवादाने पैनगंगा उपखोऱ्यात निम्न पैनगंगा धरणापर्यंतचा संपूर्ण पाणी वापर अनुज्ञेय केलेला असताना तो ३३३८ दलघमी एवढा मर्यादित करणे ही विसंगती असून त्याबाबत पुनर्विचार होणे आवश्यक असल्याबाबतची शिफारस गोदावरी खोरे जलआराखड्यात करण्यात आलेली आहे लवादाने सर्व पाणी वापर राज्यास अनुज्ञेय केलेला असताना सदर पाणी वापर कोणताही करारनामा झालेला नसताना केवळ सचिव स्तरावरील बैठकीतील चर्चेनुसार मर्यादित करणे योग्य नाही तसेच राज्याच्या हिताचे नाही सबब लवादाने अनुज्ञेय केल्यानुसार पैनगंगा उपखोऱ्यात निम्न पैनगंगा धरणापर्यंत एकुण १४०४ दलघमी (४७४२-३३३८) पाण्यावरील हक्क राज्याने सोडून न देता सदर पाण्याची तरतूद एकात्मिक राज्य जल आराखड्यात करणेबाबत एकात्मिक राज्य जलआराखड्यासाठी गठीत कृती गटांचे बैठकांमध्ये वेळोवेळी मागणी करण्यात आली तथापि एकात्मिक राज्य जलआराखड्यात त्याप्रमाणे तरतूद करण्यात आली नाही त्यामुळे त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला असता माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०२.२०१९ रोजी संपन्न झालेल्या राज्य जल परिषदेच्या ६ व्या बैठकीचे इतिवृत्तातील – मध्ये मध्य गोदावरी व पैनगंगा उपखोऱ्यात लवादाने महाराष्ट्रास अनुज्ञेय केलेला सर्व पाणी वापर होण्याच्या दृष्टीने निर्देश देण्यात आलेले आहेत त्या दृष्टीने आवश्यक प्रस्ताव तयार करून शासनास सादर करण्यात आला तसेच वेळोवेळी त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला सद्यस्थितीत शासनाने दि.१२.११.२०२१ चे सदर प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे सदर मान्यतेमुळे पैनगंगा उपखोऱ्यात महाराष्ट्र राज्यात पाणी ४९.५८ अघफु (१४०४ दलघमी (४७४२-३३३८) अतिरिक्त पाणी उपलब्ध झालेले असून मराठवाडा विभागातील हिंगोली जिल्ह्यातील औंढा व कळमनुरी, हिंगोली तालुक्यास तसेच व नांदेड जिल्ह्यातील





हदगाव,हिमायतनगर, किनवट व माहूर या तालुक्यांना त्याचा लाभ होणार आहे सदर अतिरिक्त पाणी वापर/नियोजन पुस. अरुणावती व कयाधू उपखोऱ्यात (साखळी धरणाचे खाली) तसेच पैनगंगा खोऱ्यात उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे खालील भागात प्राधान्याने करता येईल उक्त उपलब्ध होणारे पाणी प्राधान्याने उर्ध्व पैनगंगा प्रकल्पातील प्रत्यक्ष तूट भरून काढण्यासाठी वापरण्यात यावे व उर्वरित पाणी उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे निम्न भागात वापरण्यात यावे

असे शासन पत्रातील मुद्दा क्र .४ मध्ये निर्देशित करण्यात आलेले आहे शासनाने पैनगंगा उपखोऱ्यात अतिरिक्त पाण्यास मंजूर देताना शासनपत्रात खालील प्रमाणे अटी घालण्यात आलेले आहेत(अ) उपरोक्त नुसार अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यातून अस्तित्वातील धरणाच्या उर्ध्व बाजुस कोणताही नवीन प्रकल्प घेतला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी जेणेकरून त्या धरणाच्या पाणी वापरात तूट येणार नाही (ब) गोदावरी पाणी तंटा लवादाच्या कोणत्याही अटीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी(क) उपरोक्त अनुज्ञेय अतिरिक्त पाण्याचा वापर/नियोजन उपरोक्त मुद्दा क्रमांक ४ मधील वापर करून उर्वरित पाणी पुस. अरुणावती व उर्ध्व पैनगंगा या प्रकल्पांच्या खालील भागात प्राधान्याने करण्यात यावा (ड) लाभक्षेत्रात एखाद्या ठिकाणी पाणी नियमितपणे मिळत नसेल तर त्या ठिकाणी अपवाद म्हणून पूर्व मान्यतेने प्रकल्प प्रस्तावित करता

येतील त्यानुसार सदर पाण्यातून प्राधान्याने उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गतच्या इसापुर धरणाची ७५२ दलघमी ची तूट भरून काढण्याच्या योजना खालील प्रमाणे प्रस्तावित आहेत (१) गोजेगाव संगम चिंचोली बंधारा-९७.० दलघमी (२) दिगडी बंधाऱ्यावरून उपसा करून पाणी इसापुर धरणात वळविणे-५८२ दलघमी (टिप-खरबी बंधाऱ्यावरून १०२.४६ दलघमी इसापुर धरणात वळविणेच्या योजनेस यापूर्वीच पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त आहे

तसेच सद्यस्थितीत शासनाने मंजूर केलेल्या अतिरिक्त पाण्यातून उर्ध्व पैनगंगा प्रकल्प ते निम्न पैनगंगा प्रकल्प या भागात गोजेगाव, बनचिंचोली, पांगरा, साप्ती, घारापुर,किनवट व मालेगाव हे सहा उच्च पातळी बंधारे प्रस्तावित आहेत त्यांचा एकूण पाणी वापर ६१.८६ दलघमी आहे त्या व्यतिरिक्त धनोडा बंधारा ११.५० दलघमी (पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त) व पडसा पूल वजा बंधारा०.५६ दलघमी हे प्रकल्प प्रस्तावित आहेत राज्य सरकारच्या निर्देशाचे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने तातडीने अंमलबजावणी करून मराठवाड्यातील वाढलेला सिंचन अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने कटाक्षाने पाऊले टाकावी अशी मागणी यावेळी सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर यांनी केली आहे

संपादकीय

# नियत!

'दंड' न करता 'न्याय' करणारी नवी संहिता वाजत-गाजत अमलात येत असताना आणि राजधानी दिल्लीत या नव्या नियमावलीचे गुणगान सत्ताधाऱ्यांकडून सुरू असताना तिकडे झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना उच्च न्यायालयाने दिलेल्या जामिनाची चर्चा होणे हा खरा काव्यात्म न्याय. सोरेन हे सत्ताधारी भाजपस आव्हान देणाऱ्या झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षाचे प्रमुख होते आणि आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात त्यांना तुरुंगात डांबून त्या पक्षावर मात करण्याचा प्रयत्न भाजपकडून झाला. त्या प्रांतांतील राजकीय रिवाजाप्रमाणे सोरेन तुरुंगात असताना त्यांच्या पत्नीने किल्ला लढवला या वा अन्य कारणांमुळे सोरेन यांस मिळालेला जामीन महत्त्वाचा ठरतो, असे बिलकूल नाही. तर ज्या गुन्ह्यासाठी सोरेन यांस सक्तवसुली संचालनालयाने तुरुंगात डांबले, जो आर्थिक घोटाळा सोरेन यांनी केला असे केंद्रीय पातळीवर कंठशोष करून सांगितले जात होते, ज्या भ्रष्टाचारासाठी सोरेन यांच्यावर ठपका ठेवला जात होता त्या वा तसे काही करण्यात सोरेन यांचा हात असल्याचा पुरावा नाही, असे न्यायाधीश सोरेन यांस जामीन देताना म्हणतात ही बाब संबंधित यंत्रणांसाठी आणि ती यंत्रणा राबवणाऱ्यांसाठी लाजिरवाणी ठरते. या नामुष्कीवर निर्विवाद मालकी हक्क केंद्र सरकारचा. संसदेत राजकीय प्रतिस्पर्ध्यास केंद्रीय यंत्रणांच्या ससेमिऱ्याद्वारे नामोहरम करण्याचा कसा प्रयत्न होतो याचे वाभाडे निघत असताना त्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचे एकूणच प्रकरण मुदलात समजून घेणे रास्त.

सोरेन यांस अटक झाली ३१ जानेवारी रोजी. मनरेगा, खाण कंत्राट इत्यादींतील सोरेन यांच्या कथित घोटाळ्यांची सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी सुरू होती. यापेक्षाही गंभीर होता तो लष्करी अधिकाऱ्यांसाठी असलेला भूखंड सोरेन यांनी अवैधपणे विकल्याचा आरोप. हा जमीन विक्रीचा प्रकार प्रथम आढळला लष्करी यंत्रणेस. आपल्या अखत्यारीतल्या जमिनींच्या नोंदी तपासत असताना झारखंडमधील जागेच्या मालकीबाबत काही फेरफार झाल्याचे या विभागास लक्षात आले आणि त्यामुळे त्याची चौकशी सुरू झाली. यात नाव समोर आले ते कोणा भानु प्रताप प्रसाद नामे इसमाचे. ही सरकारी सेवेतील व्यक्ती जमिनींच्या व्यवहारांसाठी त्या भागात ओळखली जाते. लष्कराच्या या जमीन व्यवहारात तिचा सहभाग असल्याच्या संशयावरून गतसाली एप्रिल महिन्यात सक्तवसुली संचालनालयाने धाडसत्र हाती घेतले. त्यात 'कित्येक ट्रंका' भरून जमीन व्यवहारांचा दस्तावेज साठा त्याच्या घरून हाती घेण्यात आल्याचे संबंधितांकडून सांगितले गेले. सरकारी सेवेत असलेल्या या प्रसाद यांचे लागेबांधे थेट मुख्यमंत्री सोरेन यांच्याशी आहेत असे सक्तवसुली यंत्रणेचे म्हणणे. त्यात सोरेन हे केंद्र सत्ताधारी भाजपस राजकीयदृष्ट्या प्रतिकूल हा केवळ योगायोग म्हणायचा. त्याच योगायोग मालिकेतून या प्रसाद यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आणि ती करता करता संबंधित यंत्रणेने गतसाली सोरेन यांच्यावरही गैरव्यवहारांचा ठपका ठेवून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला गेला. या प्रसाद यांस तुरुंगात डांबल्यानंतर त्यांच्या मोबाइल फोनमधील तपशील तपास यंत्रणांनी काढून घेतला आणि त्याद्वारेही त्याचे आणि सोरेन यांचे संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न झाला. यात वादग्रस्त ठरलेला जमिनीचा तुकडा प्रत्यक्षात सोरेन यांच्या मालकीचा आहे, असेही सांगितले गेले आणि ही मालकी सिद्ध करण्यासाठी जंग जंग पछाडले गेले. ही लष्करी जमीन खरेदी करण्याचा अधिकार सोरेन यांस मुळातच नाही आणि तरीही त्यांनी हा जमीन व्यवहार केला हा यातील मध्यवर्ती आरोप. 'प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँडिरग ॲक्ट' (पीएमएलए) या सध्या विरोधी पक्षीयांविरोधात परवलीच्या झालेल्या कायद्यांतर्गत सोरेन यांच्याविरोधात प्रकरण चालवले गेले आणि अखेर जानेवारी महिन्याच्या अखेरीस त्यांस अटक झाली.

म्हणजे सोरेन यांनी कधी न्यायालयीन कोठडी तर कधी पोलीस कोठडी असे पाच महिने तुरुंगात घालवले. गेल्या शुक्रवारी त्यांस जामीन मिळाला. तो देताना झारखंड उच्च न्यायालयाचे न्या. रंगेन मुखोपाध्याय यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या आरोपपत्राची जी चिरफाड केली ती लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या जमिनीबाबत सोरेन यांच्यावर ठपका ठेवला गेला त्या जमिनीवर इतकी वर्षे वास्तव्य करणाऱ्यांनी इतक्या वर्षांत या व्यवहाराबाबत काहीच कसा आवाज उठवला नाही येथपासून ते या जमिनीवर सोरेन हे भोजनगृह बांधू इच्छितात

# मराठी साहित्य व कला सेवा''आणि ''शोध आनंदाचा फाउंडेशन चे रंगले पाचवे कविसंमेलन

प्रतिनिधी:(सनी आडेकर) सर्वत्र वाढलेला उष्मा कमी कधी होतोय अंगाची लाही लाही होत असताना पावसाच्या आगमनाची चाहूल लागली असताना, पर्जन्य धारा धर्तीवर कोसळण्याची चातकासारखी वाट पाहणारी सजीव सृष्टी आनंदतानाच कवी आपल्या कल्पनेतला पाऊस व्यक्त करण्यासाठी एकवटली दादर येथील राजा शिवाजी विद्यालय हिंदू कॉलनी पुर्व याठिकाणी मराठी साहित्य व कला सेवा आणि शोध आनंदाचा फाउंडेशन वतीने आयोजित पाऊसधारा व आपल्या आवडत्या साहित्यिकांच्या कविता सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात वरील आयोजकांच्या वतीने देण्यात आले होते ७ जुलै रोजी रविवारी पार




पडलेल्या मासिक संमेलनासाठी दुरदुर ठिकाणाहून कवी/कवयत्री आले होते त्यापैकी कल्पना दिलीप मापुस्कर या अध्यक्षस्थानी होत्या सुरू वातीला सरोज सुरेश गाजरे यांच्या मातापित्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी वैभवी विनीत गावडे, सुहास नारायण जोशी सुनिता पांडुरंग अनभुले, प्रसाद यशवंत कोचरेकर ,अमोल खेडेकर ,रामकृष्ण चिंतामण कामत मिरा सावंत ,गौरी यशवंत पंडित ,बालकवी वेदांत पंडित, अपर्णा अनिल पुराणिक, प्रणाली प्रकाश सावंत ,डॉक्टर मानसी पाटील, शितलादेवी सुनील कुलकर्णी, नंदा कोकाटे, आदित्य प्रदीप भडवळकर, अनु झंझे, स्मिता शाम तोरस्कर, सानिका ज्योती कुमार कुपटे ,सनी आडेकर, यांनी आपल्या कविता सादर केल्या त्याचप्रमाणे वैभवी गावडे यांनी अल्पोपहार याची सुरेख व्यवस्था पार पाडली होती दुसर्या सत्रात आवडत्या साहित्यिकांच्या कविता सादरीकरणाने वातावरण उल्हासित झालेले होते सर्व साहित्यिकांना यावेळी सन्मानपत्र प्रदान करण्यात आले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गुरुदत्त वाकदेकर यांनी केले तर हे संमेलन यशस्वी करण्यासाठी शोध आनंदाचा फाउंडेशन चे अध्यक्ष श्री नितीन सुखदरे, सचिव श्री सनी आडेकर, श्री शेलेश निवाते, सौ वैभवी गावडे, मराठी साहित्य व कला सेवा चे अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर यांनी अथक परिश्रम घेतले

# लोकप्रतिनिधींचे कोकणाकडे कायम दुर्लक्ष! इथे विकासाची गंगा वाहणार कधी?

नागोठणे -: नारायण म्हात्रे

कोकणाकडे आजी-माजी लोकप्रतिनिधींचे कायम दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसून येत आहे. कोकण म्हटलं म्हणजे सौंदर्याची खाण या कोकणाचे पर्यटन क्षेत्र वाढावे असे येथील जनतेला वाटते पण या ठिकाणाहून निवडून गेलेली राजकीय मंडळींना कोकणाबद्दल कायम पोटदुखी कोकणाला लाभलेला हिरवागार निसर्ग, डोंगर दरी त्यातून मिळणारा गौण खनिज, निरनिराळी वनौषधी वनस्पती व अनेक प्रकारची फळे, निरनिराळे पशू-पक्षी, अथांग समुद्र किनारा त्यातून मिळणारी मासळी, छ. शिवाजी महाराजांनी बांधलेले किल्ले, स्वच्छ सुंदर प्रसन्न वातावरण अशी एक ना अनेक उदाहरणे असतांना पर्यटनासाठी एकापेक्षा एक संधी व व्यवसायासाठी पूरक असणारा हा सर्वांग सुंदर कोकण अजूनतरी विकासापासून कोसो दुर असल्याचे म्हटले जात आहे. या ठिकाणाहून निवडून गेलेले दलबदलू सर्व लोकप्रतिनिधी यांचे स्वतःचे पोटभरु धोरण हे आड येत असल्या कारणाने कोकणचा विकास होत नाही आणि तो जर झाला तर इथला माणूस व शेतकरी राजा सधन होईल व तो आपल्या पायावर सर्वस्वी उभा राहिल या भितीपोटी कोकणातील आमदार, खासदार विकासाच्या बाबतीत नेहमीच दुर्लक्ष करीत आलेले आहेत, म्हणूनच आज सतरा वर्षे झाली तरी मुंबई -गोवा महामार्गाचे काम पूर्ण होत नाही तो पूर्ण व्हावा म्हणून कोकणातील सर्व पत्रकार, अनेक सामाजिक संस्था यांनी वेळोवेळी सरकारचे लक्ष वेधले आहे पण उपयोग शून्य कोकणाचा प्रवेशद्वार असलेले पनवेल या ठिकाणाहून नागोठणे व पुढे कोकणात यायला-जायला रेल्वेच्या फे-या नाहीत इथे सुध्दा प्रवासी, विद्यार्थी यांचे आतोनात हाल पहायला मिळतात या मागे नक्की राजकारण कोण करतंय? आणि कशासाठी? हे कोडं काही सुटत नाही. या महामार्गावर ब-याच लोकांचे प्राण जावून संसार व स्वप्न उध्वस्त झाले तसेच अनेक जायबंदी होवून मरण यातना भोगत आहेत या सगळ्या गोष्टींचा विचार करून इथले लोक प्रतिनिधी त्या त्या सभागृहात फक्त खूर्च्या उबविण्यासाठी जातात असे दिसून येत आहे कारण गेले दहा वर्ष केंद्रात असणारे भाजपचे मोदी सरकार नुसत्या धर्मावर राजकारण करत आहे व ज्या गोष्टीवर बोलायला पाहिजे त्या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष होतंय मुळात केंद्रात सरकार कुणाचेही असो कोकणाला नेहमी दुजाभाव दिला जातो. याचा अर्थ सामान्य माणूस हा जेवढा अडाणी राहील तेवढा आपला फायदा आहे तसेच नको त्या योजना (मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण) या अशा अनेक योजना आणून जनतेला दुबळे बनविण्याचे कारस्थान दोन्ही सरकार करत आहे. त्यापेक्षा कोकणात जे जे पिकतय त्यावर संशोधन करून व लघुउद्योग निर्माण करुन गावातील या प्रत्येक बहीणीला व दिव्यांग भावाला, युवक-युवतीच्या हाताला काम देवून त्यांचे हात बळकट करायला पाहिजे पण तसे चित्र दिसत नाही व हे का घडतंय? याच्या पाठीमागे इथले घाणेरडे राजकारण व इथल्या लोकांचे कमी असलेले ज्ञान, अभ्यास व एकीचे बळ हे कुठेतरी कमी पडतंय म्हणून इथले लोकप्रतिनिधी आपणच करते करविते आहोत या भ्रमात वावरत आहेत हे असंच चालत राहिले तर एक दिवस या कोकणाचा पूर्ण -हास व्हायला वेळ लागणार नाही.

# सुधागड तालुक्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे वंचित बहुजन आघाडी आक्रमक : वीज वितरण उपअभियंत्यांना निवेदन देऊन विचारला जाब मेणबत्ती व दिवा भेट

**कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा**

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी मंगेश यादव

ऐन पावसाळ्यात सुधागड तालुक्यात विजेचा लपंडाव सुरु आहे. या खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे सर्वसामान्य जनता व व्यावसायिक हैराण झाले आहेत. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी आक्रमक होऊन सोमवारी (ता.८) पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाली वीज वितरण उपअभियंत्यांना निवेदन देऊन जाब विचारला. तसेच मेणबत्ती व दिवा भेट देऊन अनोखे आंदोलन केले. काही काळात वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देखील दिला. 



या निवेदनात नमूद केले आहे की सुधागड तालुका हा मागास व ग्रामीण तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील सामान्य जनता, विद्यार्थी, कामगार लघुउद्योग, शाळा आदी आस्थापने या विजेवर चालणाऱ्या उपक्रमांवर अवलंबून आहेत. तालुक्यातील ग्राहक नियमितपणे वीज बिल भरत असतात, आणि ते न भरल्यास तातडीने ते आपल्याकडून खंडित केले जाते. वारंवार वीजपुरवठा खंडित करण्यात येत असल्याने येथील जनता त्रस्त आहे. पावसाळ्यात विज जाऊ नये म्हणून उन्हाळ्यात आठवड्यातून किमान पाच-सात लोड शेडिंग घेत असता. मात्र त्याचा काही उपयोग होत नाही. आज सुद्धा पावसाळ्यात वारंवार अनेक कारणे सांगून वीज खंडित करण्यात येते. तसेच विजेचा युनिट दर वाढल्यामुळे त्याचा त्रास सुद्धा होताना दिसत आहे. यामुळे महावितरणचा ढीसाळ कारभार समोर येत आहे. येणाऱ्या पुढील काळात विद्युत पुरवठा खंडित करण्यात येऊ नये, अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महावितरण कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल. सध्या आपल्या कार्यालयात सुद्धा वीज पुरवठा खंडित होत असतो. त्याकरिता आपणास मेणबत्ती व दिवा सप्रेम भेट देत आहेत. असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड, तालुका अध्यक्ष राहुल गायकवाड, तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत जगताप, नारायण जाधव, भागवत गायकवाड, प्रशांत गायकवाड, नितेश पवार, बाळाराम गायकवाड व आनंद जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलुंड येथे राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

आबलोली (प्रतिनिधी)

आचार्य अत्रे जयंती कार्यक्रम समिती मुलुंड (अत्रेय सन्मानचिन्ह प्राप्त संस्था) यांच्या वतीने आचार्य प्रल्हाद केशव अत्रे शतकोत्तर रौप्य महोत्सवी सांगता वर्ष २०२४ चे



औचित्य साधून राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रोजी केळकर शिक्षण संस्थेच्या विनायक गणेश वझे महाविद्यालय मुलुंड येथे करण्यात आले आहे. प्रथम पारितोषिक विजेत्या स्पर्धकास आचार्य अत्रे फिरता करंडक प्रदान करण्यात येणार असून प्रथम तीन क्रमांक व उत्तेजनार्थ सहा अशी रोख रक्कमेची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेत १२५ स्पर्धक सहभागाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्पर्धेसाठी आचार्य अत्रे यांचे बेळगाव कारवार सीमा लढ्यातील योगदान, मला समजलेले आचार्य अत्रे, प्रसारमाध्यमे आणि सामाजिक भान, आचार्य अत्रे आणि विडंबन साहित्य हे चार विषय ठेवण्यात आले असून स्पर्धेचा कालावधी ७ मिनिटे आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशिका ३० जुलै २०२४ पर्यंत पाठवाव्यात स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आचार्य अत्रे जयंती दिनी मंगळवार दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता मराठा मंडळ मुलुंड मुंबई या ठिकाणी होणार आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी अरुण भंडारे-९८२००५५७७४, श्रीकांत फौजदार-९८३३०२७२७७, महाराष्ट्र सेवा संघ कार्यालय मुलुंड पश्चिम यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# वसंतराव नाईक हे आधुनिक शेती आणि तंत्रज्ञानाचे शिल्पकार असून त्यांचे कार्य व विचार संपूर्ण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी व अभिमानास्पद आहेत : मंत्री ना. अब्दुल सत्तार

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक हे आधुनिक शेती आणि तंत्रज्ञानाचे शिल्पकार असून त्यांचे कार्य व विचार संपूर्ण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी व अभिमानास्पद आहेत असे प्रतिपादन राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले. जंगला तांडा ता. सोयगाव येथे आयोजित माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कृषी क्षेत्राला बळकटी मिळावी तसेच तरुणांना कृषी क्षेत्रात योग्य संधी उपलब्ध व्हाव्या यासाठी स्व. वसंतराव नाईक यांनी कृषी विद्यापीठांची निर्मिती केली.कापूस एकाधिकार योजना, पाणी आडवा पाणी जिरवा, हरितक्रांती, धवलक्रांती,जलक्रांती यासारख्या योजना राबवल्या. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये स्व. वसंतराव नाईक यांचे महत्वपूर्ण योगदान असल्याचे ना. अब्दुल सत्तार म्हणाले.

फर्दापूर शिवारात उभारण्यात येणार संत सेवालाल महाराज स्मारक जगप्रसिद्ध अजिंठा लेणी परिसरातील फर्दापूर शिवारात उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच भीमपार्कच्या धर्तीवर संत सेवालाल महाराज स्मारक उभारण्यात येईल अशी घोषणा यावेळी ना. अब्दुल सत्तार यांनी केली. याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेवून येत्या दोन महिन्यात या प्रकल्पाला मंजुरी मिळवून देवू असे ना. अब्दुल सत्तार म्हणाले.

स्व.वसंतराव नाईक जयंती उत्सव थाटात जंगला तांडा येथे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचा जयंती महोत्सव थाटात पार पडला.



फटाक्यांची आतषबाजी, पारंपरिक वाद्य, स्व. वसंतराव नाईक, संत सेवालाल महाराज यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. कार्यक्रमात पावसाचे आगमन झाले होते तरी पावसात देखील उपस्थितांचा उत्साह कायम होता.

बंजारा समाजच्या वतीने ना. अब्दुल सत्तार यांचा भव्य सत्कार ना. अब्दुल सत्तार यांचा जंगला तांडा गावात आगमन होताच समाज बांधवांनी त्यांचे पारंपरिक पध्दतीने गीत व नृत्य सादर करीत भव्य स्वागत सत्कार केला. समाज बांधवांनी केलेला सत्कार माझ्यासाठी प्रेरणादायी असून या सत्कार सोहळ्याने भारावून गेलो असल्याची भावना ना. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली.

मंत्री अब्दुल सत्तार यांनी परिधान केला बंजारा समाजाचा पोशाख सोयगाव तालुक्यातील बंजारा समाजात मंत्री अब्दुल सत्तार यांची प्रचंड लोकप्रियता आहे. समाजाच्या होळी व इतर सण उत्सवात ना. अब्दुल सत्तार नेहमी सहभागी होतात. ना. अब्दुल सत्तार यांनी या कार्यक्रमात बंजारा समाजाचा पारंपरिक पोषाख परिधान केला होता. नेहमी टोपी रुमाल परिधान करणारे अब्दुल सत्तार यांना बंजारा समाजाच्या पोषाखात पाहताच जमाज बांधवांचा उत्साह द्विगुणित झाला.

महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावाराज्यातील सरकार हे लोककल्याणकारी सरकार असून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्यांच्या हिताच्या अनेक योजना व निर्णय घेतले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही अत्यंत महत्वकांक्षी योजना असून पात्र महिला भगिनींनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन ना. अब्दुल सत्तार यांनी याप्रसंगी केले.

यांची होती उपस्थिती

कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण,माजी जि. प. सदस्य गोपीचंद जाधव,माजी सभापती रामदास पालोदकर, जितसिंग करकोटक, लख्खुसिंग नाईक , माजी सभापती मुलचंद राठोड , हिरा चव्हाण , बाबू चव्हाण, श्रावण राठोड, सरपंच वसंत राठोड, विशाल चव्हाण, राणीदास चव्हाण, भरत राठोड, वरखेडी तांडा सरपंच विनोद जाधव, न्हावी तांडा सरपंच सांडू राठोड, यशवंत जाधव, मेघराज राठोड, अरविंद राठोड, जामठी सरपंच राधेश्याम जाधव, जंगला तांडा सरपंच भारत राठोड, घाणेगाव सरपंच सुरेश चव्हाण ,डॉ.सुदाम चव्हाण, डॉ. वसंत चव्हाण , मदन राठोड , देव्हारी सरपंच पंडित राठोड, मगन जाधव , राहुल राठोड , नांदा तांडा सरपंच देविदास चव्हाण, कान्हीराम जाधव , बहुलखेडा सरपंच राजमल पवार, घाणेगाव उपसरपंच हिरा राठोड यांच्यासह गणेश राठोड, विजय राठोड, भिला चव्हाण, मदन चव्हाण, जोगी राठोड, जुगराज राठोड, मिश्रिलाल राठोड, दारासिंग राठोड, संतोष राठोड, अंबादास जाधव, सोना चव्हाण, श्रावण जाधव, रमेश चव्हाण, साईराज चव्हाण, नंदलाल चव्हाण, बळीराम चव्हाण, सुमित चव्हाण आदिंसह समाजातील महिला पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शरद पवार गटाला देणग्या स्वीकारण्याची मुभा; केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दिलासा

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेसला (शरदचंद्र पवार पक्ष) केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा दिलासा दिला आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या अनुच्छेद २९-ब व २९-क अंतर्गत देणग्या स्वीकारण्याची मुभा निवडणूक आयोगाने सोमवारी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिली. राज्यात पुढील तीन-चार महिन्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार असून पक्षाला निवडणुकीसाठी हेच पक्षनाव व निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी आयोगाने दिली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार हे पक्षनाव बहाल केले असले तरी, पक्षाला देणगी स्वीकारण्याची परवानगी निवडणूक आयोगाने दिली नव्हती. लोकसभा निवडणूक झाली असली तरी तीन-चार महिन्यांवर विधानसभेची निवडणूक असून देणग्या स्वीकारायच्या कशा असा प्रश्न पक्षापुढे निर्माण झाला होता. आयोगाने पक्षनाव व चिन्ह बहाल केल्यामुळे देणग्या घेण्याचीही परवानगी असली पाहिजे व इतर राजकीय पक्षांना देणग्या स्वीकारताना मिळणारी करसवलतही मिळाली पाहिजे अशी आग्रही मागणी पक्षाने केंद्रीय निवडणूक आयोगाला केली होती.




देणगी स्वीकारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती.

पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या शिष्टमंडळाने केंद्रीय निवडणूक आयोगाची सोमवारी भेट घेतली. शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर देणग्यांचे धनादेश स्वीकारण्याची पक्षाची मागणी मान्य करण्यात आली.

राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सत्ताधारी महायुतीत सामील होण्याचा निर्णय घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडली. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार यांचा पक्ष मूळ राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निकाल दिला होता. आयोगाने शरद पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार हे पक्षनाव व तुतारी घेतलेला माणूस हे निवडणूक चिन्ह बहाल केले होते. लोकसभा व विधानसभा

**२३ जुलै रोजी सुनावणी**

राष्ट्रवादी काँग्रेससंदर्भातील प्रकरणांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अजित पवार गटाच्या आमदारांना अपात्र करण्यासंदर्भात शरद पवार गटाने केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी पवार गटाचे म्हणणे ऐकून घेतले. यासंदर्भात २३ जुलै रोजी सरन्यायाधीशांसमोर सुनावणी होणार असल्याची माहिती शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी दिली.आम्हाला देणग्यांचे धनादेश घेण्यासाठी करसवलत मिळत नव्हती. आम्हाला देणग्या पारदर्शक पद्धतीनेच स्वीकारायच्या आहेत. इतर मोठ्या पक्षांना देणग्यांमध्ये करसवलत मिळते, तशी आमच्याही पक्षाला मिळावी अशी आम्ही मागणी केली होती. सुप्रिया सुळे, खासदार

# कैलासवासी 'कू'!

खरे तर या घटनेचे कोणास आश्चर्य कसे वाटले नाही, याचे आश्चर्य वाटते. देशाच्या सर्वोच्च नेत्याच्या आदेशावरून लाखो, कोट्यवधींनी हे ॲप आपापल्या मोबाइलमधे डाऊनलोड करून घेतले. सर्वोच्च नेत्याच्या साजिंद्यांपाठोपाठ अन्य कोट्यवधी जल्पकांच्या आत्मनिर्भर गँग्सनी देशाच्या प्रतिष्ठेसाठी हातमिळवणी केली आणि हे ॲप वापरण्याचा निर्धार केला. कोण कोणते दीडदमडीचे ट्विटर! हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा असलेल्या, महासत्ता होऊ घातलेल्या, विश्वगुरूंची खाण असलेल्या या देशाच्या इभ्रतीचा अपमान करू धजते यामुळे 'सव्वासो क्रोर' भारतीयांना आलेल्या सात्त्विक संतापातून याचा जन्म झालेला.

इस्लामधार्जिण्या, पुरोगामी हिंदू धर्म बुडव्यांना याद्वारे चोख उत्तर दिले जात होते. लोकशाहीची जननी असलेल्या प्रदेशाच्या उद्धारासाठी कार्यरत जगातील सर्वात मोठ्या पक्षाच्या अनेक नेत्यांनी, अनुयायांनी याचा स्वीकार केलेला! या पक्षाचे अधिकृत सदस्यच मुळी १० -१२ कोटी. तेव्हा गेला बाजार सर्वोच्च नेत्याच्या आदेशानुसार इतक्या साऱ्यांच्या मोबाइलमधे तरी याचे अस्तित्व असणार. आणि तरीही हे 'कू' नामे ॲप मृत होते हे आश्चर्य आणि त्याचे कोणासही काही वाटत नाही, राष्ट्रीय शोक व्यक्त होत नाही, निती आयोग 'कू'च्या अवस्थेत लक्ष घालत नाही हे महद्आश्चर्य! ते व्यक्त करणे हे कर्तव्य ठरते. याचे कारण एकेकाळच्या 'ट्विटर'ला आणि आताच्या 'एक्स'ला पर्याय म्हणून साधारण पाच वर्षांपूर्वी या पुण्यभूमीत 'कू' या स्वदेशी मायक्रोब्लॉगिंग साइटचा घाट घातला गेला. सुरू झाल्या झाल्या केवढे कौतुक झाले या 'कू'चे. दिल्लीतून साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून त्या पक्षाच्या राष्ट्र पुनरुत्थानासाठी भूतलावर अवतार घेतलेल्या गल्लीतील साध्या पक्ष कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनी या स्वदेशी भारतीय ट्विटरानुकरणाचा पुरस्कार केला. तथापि बुधवारी या 'कू'च्या पक्षाने आकाशाकडे पाहात चोच उघडून प्राण सोडले. हा हंत हंत नलिनी गज उज्जहार वगैरे वगैरे.

कारण काय? तर मागणी नाही आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे गुंतवणूकदार नाहीत. हे आश्चर्यावर आश्चर्य. खरे तर एका आत्मनिर्भर अभिव्यक्तीसाठी संभाव्य महासत्तेतून एकही गुंतवणूकदार 'कू'त गुंतवणूक करण्यासाठी पुढे येऊ नये यास काय म्हणावे? यामागे खरे तर भारताची प्रगती पाहू न शकणाऱ्या पाश्चात्त्य शक्तींचा हात असणार! अन्यथा पंतप्रधानांनीही आशीर्वादलेल्या उपक्रमासाठी एकही मायेचा पूत या देशात उभा राहिला नाही, हे कसे? आणि लागून लागून अशी कितीशी रक्कम या 'कू'पक्ष्यास लागणार होती? गेल्या काही वर्षांत 'कू'ने ५.७ कोटी डॉलर्स उभे केलेले. गेल्या तीन वर्षांत मात्र इतकाही पैसा उभा राहू शकला नाही. अब्जावधींची कंत्राटे मिळवणाऱ्या 'अ'घटित उद्योगपतींसाठी ही इतकी रक्कम म्हणजे खरे गल्ल्यातली चिल्लर. यापेक्षा कित्येक पट विवाहपूर्व सोहळ्यांवर खर्च होते. किंवा शहराशहरांत कबुतरांस चारा घालण्यावर आपल्या देशात तो घालणाऱ्यांकडून अधिक रक्कम खर्च होत असेल. पण त्यातील काही दाणेही या 'कू'पक्ष्याच्या वाट्यास येऊ नयेत? जवळपास सहा कोटी मोबाइलमध्ये हे ॲप होते एकेकाळी. 'ट्विटर'ची डिट्टो प्रतिकृती असलेल्या या भारतीय अनुकरणाचे कौतुक फक्त भारतीयांनाच होते असे अजिबात नाही. रोनाल्डिनोसारखा फुटबॉलपटू, दलाई लामा यांच्यासारखे धर्मगुरू असे अनेकजण 'कू' वापरत. 'ट्विटर' पूर्णपणे एलॉन मस्क याच्या हाती गेल्यावर तर ब्राझीलमधे 'कू'चे अनुयायी इतके वाढले की पाहता पाहता त्या देशातही 'ट्विटर' मागे पडले. अर्थात त्यामागे 'कू'चे नाममाहात्म्य होते, हे दुर्लक्षता येणार नाही हे खरे. एकेकाळची पोर्तुगालची वसाहत असलेल्या ब्राझीलमधे पोर्तुगीज बोलणारे अधिक असणार हे उघड आहे. पोर्तुगीज भाषेत 'कू' म्हणजे मानवाचा पार्श्वभाग. या 'वास्तवा'मुळे 'कू' त्या देशात समाजमाध्यमी कमालीचे लोकप्रिय ठरले. ब्राझीलमधील सर्वात मोठे 'कू' असा त्याचा उल्लेख होत असे. तरीही हा 'कू' पक्षी मृत झाला. त्याच्या प्रवर्तकांनी 'कू'स मूठमाती देत असल्याची अधिकृत घोषणा केली. असे का झाले असावे?

केवळ अभिनिवेश हेच भांडवल असेल तर काय होते, याचे हे जिवंत उदाहरण. आर्थिक पायाभूत सोयींचा अभाव असताना केवळ कोणास तरी धडा शिकवण्याच्या उद्देशाने हे 'कू' जन्मास घातले गेले. त्यात काही स्वतंत्र बुद्धिमत्ता होती म्हणावे तर त्याचा पूर्ण अभाव. अगदी पक्षाच्या बोधचिन्हासह ही तशीच्या तशी मूळ ट्विटरची प्रतिकृती होती. यशस्वी प्रारूपांच्या प्रतिकृती हे अर्थातच आपले वैशिष्ट्य! ॲमेझॉन यशस्वी ठरले? काढा फ्लिपकार्ट ! (तेही आपणास आपल्या हाती राखता आले नाही.) 'उबर' यशस्वी ठरली? लगेच भारतीय अनुकरण 'ओला' तयार. जगात 'टेड टॉक' गाजते आहे काय? लगेच त्याच्या बिनडोक मराठी अनुवादाचा उदय झालाच म्हणून समजा! वास्तविक उत्तम मूळ उत्पादन उपलब्ध असताना त्याच्या प्रतिकृतींस यशस्वी होणे फार अवघड असते हे सामान्यज्ञान. त्यातही मूळ उत्पादनापेक्षा अधिक काही मूल्यवर्धन, नावीन्यपूर्ण बदल असे काही असले तर प्रतिकृतीही टिकाव धरू शकते. तथापि आपल्या देशी 'कू'मध्ये या सगळ्याचा ठार अभाव होता. भारतीय भाषांत 'कू' करायची सोय सोडल्यास यात ट्विटरपेक्षा अन्य काहीही वेगळे नव्हते. तसे ते नंतर करावयाचे तर कल्पनाशक्ती लागते आणि ती आहे असे गृहीत धरले तरी कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पैसा लागतो. 'कू'बाबत तीच अडचण आली आणि यात काही गुंतवणूक-योग्य न आढळल्याने निधीचा रोख आटला. परिस्थिती इतकी बिघडली की बंगलोर-स्थित 'कू'वर कामगार कपातीची वेळ आली. पण एकट्या 'कू'लाच या परिस्थितीसाठी बोल लावणे योग्य नाही.

# भेदाभेद भ्रम अमंगळ! लोकसभेत विरोधात लढल्या पण वारीत येताच सगळं विसरल्या.

**बारामती :** संत तुकोबारायांच्या पालखी सोहळा आज बारामती शहरात आला. यावेळी बारामती शहरात शारदा प्रांगणमध्ये सांज आरती झाली.

या सांज आरतीला हजारो भाविक उपस्थित असतात.दरवर्षी होणारी ही सांज आरती देहू ते पंढरपूर वारीतील सगळ्यात मोठी आणि वेगळी अशी सांज आरती असते. साहजिकच या सांजआरतीला बारामतीसह आसपासच्या तालुक्यातील व जिल्ह्यातील भाविकही उपस्थित असतात.आज पहिल्यांदाच दोन खासदार या सांज आरतीला उपस्थित राहिले. विशेष म्हणजे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पत्नी प्रतिभा पवार याही पहिल्यांदाच या सांज आरतीला उपस्थित होत्या,

तर लोकसभेच्या नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे आणि राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार याही इथे उपस्थित होत्या. ज्यावेळी सुनेत्रा पवार आल्या, त्यावेळी त्या पालखी जिथे ठेवतात, त्या खालच्या भागात उभ्या होत्या. त्या तिथेच उभ्या राहिल्या, तर सुप्रिया सुळे आल्यानंतर शारदा प्रांगणाच्या व्यासपीठावर आल्या. व्यासपीठावरूनच त्यांनी लोकांना नमस्कार केला तसेच त्या महिलांमध्ये गेल्या.



गर्दीत उभ्या पुरुष वारकऱ्यांमध्ये गेल्या. त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर काही वेळाने पालखी आणण्यात आली. पालखी आणून मांडली, तेव्हा सुनेत्रा पवार खालीच होत्या. सुप्रिया सुळे मात्र वरतीच उभे राहिल्या, काही वेळानंतर तिथे प्रतिभा पवार आल्या. प्रतिभा पवार आणि सुप्रिया सुळे या दोघी मायलेकी एकाच ठिकाणी थांबून होत्या. ज्यावेळी आरतीची वेळ आली त्यावेळी सुनेत्रा पवार यांनी ताईना खाली बोलवा असे सांगितले, परंतु सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे पाहत खाली खूप गर्दी आहे, तुम्हीच आरती करा असे सांगत आरतीचा मान सुनेत्रा वहिनीकडे दिला आणि आरती पार पडली. बारामतीच्या राजकारणात नेहमीच निवडणुकीनंतर राजकारण होत नाही आणि समाजकारण करतो असे पवार कुटुंब सांगतं त्याचा प्रत्यय या निमित्ताने सांजआरतीच्या वेळेला आला.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
बुधवार १० जुलै २०२४




या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## पत्रकारावरील हल्ल्याचा तपास अखेर पोलीस उपअधीक्षक कडे मुक्त पत्रकार संघाच्या मागणीला यश

श्रीवर्धन कोलमांडाला; रायगडमधील श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत साप्ताहिक रायगडची लेखणी चे प्रतिनिधी पत्रकार सोपान निंबरे यांच्यावर गुंडांकडून हल्ला केला गेला.याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मात्र, त्यात पत्रकार संरक्षण कायद्यातील कलमे समाविष्ट करण्यात आली नव्हती. गुन्ह्याचा तपासही सक्षम अधिकाऱ्यांकडून सुरू नव्हता. याबाबत मुक्त पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेशजी अनंत खडे, सचिव रमेशजी देवरूखकर यांनी आक्षेप घेऊन या गुन्ह्याच्या प्रथम अहवालात पत्रकार संरक्षण कायद्याची कलमे समाविष्ट करण्याची आणि प्रकरणाचा तपास सक्षम अधिकाऱ्यांकडून होण्यासाठी लेखी मागणी केली होती. या मागणीनुसार श्रीवर्धन पोलीसांकडून तात्काळ कार्यवाही होऊन, संबंधित मधे पत्रकार संरक्षण कायद्यातील कलमे समाविष्ट करून सदर गुन्ह्याचा तपास श्रीवर्धन पोलीस उपअधीक्षक यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला आहे असे आम्हाला कळविण्यात आले. या गुन्ह्याचा योग्य तपास होऊन आरोपींविरुद्ध कठोर दोषारोपपत्र दाखल होईल याची आम्हाला खात्री आहे. संबंधित खटल्यात मुक्त पत्रकार संघ पत्रकार सोपान निंबरे यांना शेवटपर्यंत सहकार्य करील.या कार्यवाहीनंतर मुक्त पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संचालक अवधूत पेडणेकर, अविनाश वाघमारे, सम्राट संगारे, सौ रेश्मा खडे, ममता देवरूखकर तसेच संस्थेचे कायदेशीर सल्लागार अमित सरगर यांचे सर्व संघटना सदस्यांकडून आभार व्यक्त करण्यात आले.

## मानगड श्रमदान मोहीम फत्ते

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत ) दुर्गवीर प्रतिष्ठान आणि आम्ही सहयाद्रीचे शिलेदार संयुक्त विद्यमाने माणगाव तालुक्यातील किल्ले मानगड येथे



नुकतीच श्रमदान मोहीम पार पडली.

हा किल्ला ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्वाचा आहे. मागील अनेक वर्षांपासून दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे येथे श्रमदान व संवर्धन मोहिमा राबविल्या जात आहेत. नुकत्याच पार पडलेल्या या मोहिमे दरम्यान गडावरील पाण्याचे टाके स्वच्छ करण्यात आले. तसेच वास्तू, अवशेष यांच्या बाजूची झाडी-झुडपे साफ करण्यात आली. यामुळे पावसात किल्ल्यावर येणारे दुर्गप्रेमी येथील अवशेष पूर्ण पाहू शकतील. या श्रमदान मोहिमेमध्ये निलेश वाघमारे, नेहा चव्हाण, अजय कदम, सुयोग पाटील, विठ्ठल केंबळे, स्वप्नील खाडे आदीसह मुंबई, पुणे, महाड व माणगाव मधील दुर्गप्रेमींचा सहभाग होता.

# चाफेवाडी येथे मुलांना शैक्षणिक वस्तू वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

कर्जत:- जयेश जाधव

महाराष्ट्र रत्न श्री अनिल मधुकर जाधव, हे आपल्या सामाजिक कामासाठी संपूर्ण रायगड मध्ये प्रसिद्ध होते.

शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक राजकीय क्षेत्रात त्यांनी मोठ्या प्रमाणात समाज कार्य केले काम केले.त्यांचे हे कार्य त्यांचे बंधू पत्रकार पंकेश मधुकर जाधव पुढे चालवत आहेत.

त्याच प्रमाणे माऊली फाऊंडेशन आणि निसर्ग चेतना सेवा संस्था यांच्या मार्फत चाफेवाडी येथील शासकीय आश्रम शाळा येथे आज भेट देऊन तेथील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले त्यानंतर विद्यार्थी सोबत वृक्ष लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमाला निसर्ग चेतना सेवा भावी संस्थेच्या अध्यक्ष सौ. शालिनी सानप,माऊली फाऊंडेशनचे उपाध्यक्ष पत्रकार पंकेश जाधव,राहुल कार्ले, विनायक साळुंके,माऊली फाऊंडेशन चे सचिव संजीवन कांबळे शिवसेना शाखा प्रमुख अशोक धुळे,समाजसेवक संजय शेळके.मुख्याध्यापक . पाटील सर.

व सर्व शिक्षक वृंद यांनी चांगले सहकार्य केले. निसर्ग चेतना सेवा भावी संस्थेचे पदाधिकारी तसेच अरुण शेळके. धनराज जाधव, संतोष सोनावले, कैलास सोनावले, पत्रकार गौतम जाधव,अजय शेळके,सचिन जगताप,आयुष जाधव, विजय जाधव, रोहित मोरे, आदी उपस्थित होते.



# मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण देवरुख, लांजा, चिपळूण, गुहागर, खेड येथील कार्यक्रमबाबत नियोजन करावे –जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह

रत्नागिरी, (जिमाका) : मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेच्या अनुषंगाने १३ जुलै रोजी देवरुख व लांजा, १४ जुलै रोजी चिपळूण व गुहागर आणि १५ जुलै रोजी खेड येथे कार्यक्रम करण्याबाबत नियोजन करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार, अपर जिल्हाधिकारी शंकर बर्गे, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे, मुख्याधिकारी तुषार बाबर, तहसिलदार राजाराम म्हात्रे आदी उपस्थित होतेङ्ग



जिल्हाधिकारी श्री. सिंह म्हणाले, आपल्या तालुक्यातील उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी नियोजन करावे. ग्रामपंचायत तसेच शहरांमध्ये योजनेच्या प्रसिध्दीसंदर्भात पोस्टर्स, बॅनर लावावेत. रत्नागिरी येथे ज्या पध्दतीने पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत शुभारंभाचा कार्यक्रम झाला त्याच धर्तीवर कार्यक्रमाचे नियोजन करावे. त्या कार्यक्रमासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करावे, असेही ते म्हणाले.

# प्रशासनाचे दावे पाण्यात; पहिल्या मोठ्या पावसात मुंबईची दाणादाण; रस्त्यांवर पाणी, रेल्वे ठप्प

**मुंबई :** मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये रविवारी रात्रीपासून झालेल्या पावसाने मुंबईची पुरती दैना केली. पाणी तुंबणार नाही, शहर थांबणार नाही हे महापालिका आणि रेल्वे प्रशासनाचे दावे हंगामातील पहिल्याच मुसळधार पावसात वाहून गेले. अनेक ठिकाणी रुळांवर पाणी साचल्यामुळे रेल्वे कोलमडली तर शहरातील अनेक भागही जलमय झाले.

गेल्यावर्षी पाऊस कमी झाल्यामुळे गैरव्यवस्थांच्या तडाख्यातून मुंबई वाचली होती. मात्र सोमवारच्या पावसाने पहिले पाढे पंचावन्न असल्याचा अनुभव मुंबईकरांना दिला. मुंबई व उपनगरांत मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सखल भागात पाणी साचले. भरतीमुळे पाण्याचा निचरा झाला नाही. परिणामी दिवस उजाडण्यापूर्वीच शहराचे दळणवळण पुरते कोलमडले होते. काही रस्ते बंद करण्याची वेळ आली. रेल्वे प्रशासनाचे पितळही सोमवारच्या पावसाने उघडे पाडले. मध्य रेल्वेच्या अनेक लोकल गाड्या खोळंबल्याने नोकरदार वर्गाचे अतोनात हाल झाले. नवी मुंबई आणि मुंबई शहराला जोडणारा हार्बर मार्गही चुनाभट्टी भागात पाणी भरल्यामुळे ठप्प झाला. वडाळा येथील पंप बंद पडल्याने पाण्याचा उपसा होण्याचे काम थांबले. शेकडो लोकल फेऱ्या, नऊ लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द कराव्या लागल्या, तर



५०हून अधिक रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक बदलले. यामुळे लाखो प्रवाशांचे हाल झाले. त्यामुळे प्रवाशांमध्ये मध्य रेल्वेच्या कारभारावर तीव्र संताप आहे. रविवारी मध्यरात्री सुरू झालेल्या पावसाचा जोर सकाळी ७ च्या सुमारास कमी झाला. दिवसभर अधूनमधून हलक्या सरी कोसळत होत्या. दुपारनंतर दक्षिण मुंबईत पावसाने जोर धरला. तर रात्री शहर आणि उपनगरांत दमदार सरींनी पुन्हा हजेरी लावली. सोमवारी सकाळी ८:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात सरासरी १०१.८ मिमी तर, सांताक्रूझ केंद्रात १४.१ मिमी पावसाची नोंद झाली. सायंकाळच्या पावसामुळे वडाळा येथे पुन्हा पाणी भरण्यास सुरुवात झाली. त्यामुळे हार्बर मार्गावरील सीएसएमटी ते मानखुर्द दरम्यान लोकल सेवा रात्री १०.१५ वाजेपासून अनिश्चित कालावधीसाठी बंद करण्यात आली. पश्चिम रेल्वेच्या दादर स्थानकाच्या फलाट क्रमांक पाच येथे रात्री १० च्या सुमारास पॉईट बिघाड झाल्याने, लोकल सेवा विस्कळीत झाली. अप दिशेकडे जाणाऱ्या जलद मार्गावर परिणाम झाल्याने, जलद लोकल आणि दोन लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या थांबल्या होत्या.

**पाणी रामेश्वरी, पंप सोमेश्वरी**

रुळांवर पाणी भरल्यास पॉइंट मशीनमधील बिघाड टाळण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय केल्याचे मध्य रेल्वेकडून सांगितले गेले होते. २३१ ठिकाणी ही उपाययोजना केल्याचाही दावा करण्यात आला होता.मात्र, भांडूप आणि नाहूरदरम्यान ही उपाययोजना केली नव्हती आणि सोमवारी त्याच ठिकाणी पाणी साचून रेल्वे सेवा कोलमडल्याचे सूत्रांनी सांगितले.नेहमी पाणी साचणाऱ्या कुर्ला-शीव स्थानकांदरम्यान मायक्रो टनेलिंग, उच्च क्षमतेचे पंप आदी उपाययोजना केल्या जातात. मात्र यंदाही या भागात पाणी साचल्याचे दिसले.सहा तासांतील मुसळधार

प्रतिक्षा नगर २२०.२ मिमी
शिवडी कोळीवाडा १८५.८ मिमी
रावळी कॅम्प १७६.३ मिमी
धारावी १६५.८ मिमी
नाडकर्णी पार्क १५६.६ मिमी
मालपा डोंगरी २९२.२ मिमी
चकाला २७८.२ मिमी
आरे कॉलनी २५९ मिमी
एच.बी.टी शाळा २५५ मिमी
नारियल वाडी २४१.६ मिमी
वीर सावरकर मार्ग ३१५.६ मिमी
पवई ३१४.६ मिमी
कलेक्टर कॉलनी २२१.२ मिमी
(रविवारी मध्यरात्री १ ते सोमवारी सकाळी ७ वाजेपर्यंतची आकडेवारी)

मंगळवारी अतिमुसळधार?

मुंबईसह ठाणे व पालघर जिल्ह्यात मंगळवारी अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. तसेच रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार तर, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. धुळे, नंदुरबार, नाशिक, कोल्हापूर , सोलापूर जिल्ह्यांनाही मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )